दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
शुभ दिपावली
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २०६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२६ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# शिंदे-फडणवीस सरकारचा महामंडळाचा फॉर्मुला ठरला

**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

**महामंडळ नियुक्तीसाठी राज्यात जोरदार हालचाली सुरू झाल्या असून ही नियुक्ती करताना भाजपला ५० टक्के आणि इतर सर्व मित्र पक्षांना निम्म्या जागा देण्याचा प्रस्ताव निश्चित करण्यात आला आहे. दरम्यान, नियोजन मंडळ तसेच जिल्हास्तरीय अशासकीय समित्यांमध्ये मात्र ज्या पक्षाचा आमदार त्याला ७० टक्के आणि इतरांना ३० टक्के संधी देण्यात येणार आहे. या महाराष्ट्र पातळीवरील प्रयोगाची सुरुवात कोल्हापुरातून करण्यात येणार आहे.**



राज्यात भाजप, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट, जनसुराज्य सह इतर मित्र पक्षांची सत्ता येऊन तीन महिने उलटले. अजूनही सर्व पक्ष एकसंघ कारभार करताना दिसत नसल्याचे चित्र आहे. जिल्ह्या जिल्ह्यात या सर्व पक्षांच्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची मने जुळालेली नसल्याने ती जुळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक जिल्ह्यात भाजप, शिंदे गट आणि इतर सर्व मित्र पक्षांच्या नेत्यांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. त्याची सुरुवात कोल्हापुरात करण्यात आली.

मंत्रिमंडळ विस्तारीला विस्ताराला वेळ लागणार असल्याने तातडीने महा महामंडळ आणि अशासकीय कमिट्यावर सदस्यांची वर्णी लावण्यात येणार आहे. त्याच्या वाटपाचा फॉर्मुला तयार करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यात ५० टक्के महामंडळे भाजपला तर इतर सर्व मित्र पक्षांना निम्म्या जागा देण्यात येणार आहेत. नियोजन मंडळ तसेच जिल्हा आणि तालुका पातळीवर ज्या अशासकीय कमिट्या आहेत, त्यावर सदस्य नियुक्त करताना ज्या पक्षाचा आमदार त्या पक्षाला ७० टक्के आणि इतरांना ३० टक्के असा फॉर्म्युला तयार करण्यात आला आहे. यानुसार सर्व जिल्ह्यांची यादी तयार करण्यात येत आहेत. त्याची सुरुवात कोल्हापुरात करण्यात आली.

प्रत्येक जिल्ह्यात त्या त्या पक्षाच्या दोन नेत्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समन्वयाकडून राज्यांच्या नेत्याकडे नावे पाठवण्यात येणार आहेत. कोल्हापुरात मंगळवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार धनंजय महाडिक, आमदार विनय कोरे, प्रकाश आबिटकर, प्रकाश आवाडे, राजेंद्र यड्रावकर, राजेश क्षीरसागर, सुरेश हाळवणकर,अमल महाडिक, समीत कदम,प्रा.जयंत पाटील, यांच्यासह अनेक नेत्यांची बैठक झाली. त्यामध्ये विविध कमिट्याबाबत चर्चा झाली. याच पद्धतीने आता प्रत्येक जिल्ह्यात सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेऊन नावे निश्चित करण्यात येणार आहेत.

## शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषि कृती विकास आराखडा तयार करणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दीपावली निमित्त राज्यभर प्रकाशपर्व साजरे होत असताना मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्याने आज अनोखी दिवाळी अनुभवली. राज्यातून आलेल्या शेतकरी कुटुंबियांसोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहकुटुंब दिवाळी साजरी केली. त्यांच्यासोबत फराळाचा आस्वाद घेतला. आलेल्या प्रत्येक शेतकरी कुटुंबाचे औक्षण करीत त्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. मुख्यमंत्र्यांच्या या आगळ्यावेगळ्या कृतीमुळे भारावून गेलेले शेतकरी बांधव वर्षा निवासस्थ-ानातून बाहेर पडताना मुख्यमंत्र्यांनी बळीराजाची कदर केल्याची भावना व्यक्त करताना दिसून आले.

राज्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषि कृती विकास आराखडा तयार करीत असल्याचे सांगतानाच नैसर्गिक आपत्तीत सरकार तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही. तुम्ही धीर सोडू नका. राज्य शासन तुमच्या पाठीशी असल्याची ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिली.

सर्वत्र दिवाळीचा उत्साह आणि धामधुम सुरू असतानाच वर्षा निवासस्थान आज गजबजून गेले होते, ते राज्यातून आलेल्या बळीराजाच्या आगमनाने राज्यभरातील बहुतांश जिल्ह्यातून प्रातिनिधीक स्वरुपात शेतकरी बांधव सपत्नीक या अनोख्या सोहळ्याला उपस्थित होते. पहिल्यांदाच अशा स्वरुपाची दिवाळी वर्षा निव-ासस्थानी साजरी झाल्याचे अनेकांनी सांगितले.

आज गडचिरोली येथील दौरा करुन मुख्यमंत्री वर्षावर आले. त्यानंतर त्यांनी त्यांची पत्नी सौ. लता, मुलगा खासदार डॉ. श्रीकांत, स्नुषा सौ. वृषाली यांनी प्रत्येक शेतकरी कुटुंबांचे जागेवर जाऊन औक्षण केले. त्यांना साडी- चोळी, धोतर आणि भेटवस्तू देऊन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांचे कुटुंबिय आपले औक्षण करताय हे पाहून शेतकरी बांधव आणि त्यांचे कुटुंब हरखून गेले होते.

या हृद्य सोहळ्यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. बळीराजा हा राज्याच्या विकासात महत्वाचा घटक असून, त्याच्यासाठी आम्ही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस यांमुळे बळीराजाला नैसर्गीक आपत्तीला तोंड द्यावे लागते. याप्रसंगी मी आपणा .../२



## पनवेल एसटी स्थानक उभारणीच्या आंदोलनात महाविकास आघाडीचे नेते होणार सक्रिय सहभागी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तब्बल १४ वर्षांच्या वनवासानंतर देखील राज्य परिवहन मंडळाच्या पनवेल स्थानकाचे शुक्लकाष्ठ संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. पनवेल प्रवासी संघ, प्रस्तावित बांधा व हस्तांतरित करा धर्तीवर उभारण्यात येणाऱ्या स्थानक संकुल इमारतीचे साठी पाठपुरावा करत आला आहे.२०१८ साली या कामासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्या नंतर सुद्धा अद्यापही प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही. सदरचा प्रकल्प लाल फितीच्या कारभारात अडकला असल्याकारणामुळे प्रशासनास जागृत करण्यासाठी पनवेल प्रवासी संघाने आंदोलनाचे संविधानिक हत्यार उपसण्याचे ठरविले आहे. ३ नोव्हेंबर २०२२ रोजी होणाऱ्या पनवेल प्रवासी संघाच्या या आंदोलनास महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पाठिंबा दर्शवत कार्यकर्त्यांसमवेत सक्रिय सहभागी होणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

पनवेल प्रवासी संघाचे पदाधिकारी अभिजीत पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार बाळाराम पाटील, सुप्रसिद्ध उद्योजक जे एम म्हात्रे यांना आंदोलनाचे पत्र दिले असता या द्वयीने सदरच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा दर्शवत हिरीरीने सहभागी होणार असल्याचे कळविले. अशाच स्वरूपाचे पत्र शिवसेनेचे ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) .../२

## माथेरानमध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक सुरू करणार : आ.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये सातत्याने बँकिंग व्यवहारांमध्ये होणाऱ्या अडचणी पाहता लवकरच येथे रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा सुरू करणार असे आमदार जयंत पाटील यांनी आज त्यांच्या माथेरान दौऱ्यामध्ये जाहीर केले.

माथेरान मध्ये सध्या युनियन बँक ऑफ इंडिया ही एकमेव बँक कार्यरत आहे परंतु या बँकेचा कारभार व येथे असलेले एटीएम हे माचरणकारांसाठी कायम डोकेदुखी ठरले आहे एटीएम हे सातत्याने बंद असते तर बँकेमधील व्यवहारी नेटवर्कचे कारण देत नेहमीच रखडलेले असतात या बँकेकडे अधिकाऱ्यांचेही दुर्लक्ष असल्याने फक्त नावालाच ही बँक चालवली जाते त्यामुळेच माथेरान शेकापणे माथेरान मध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक सुरू करावी अशी मागणी आमदार जयंत पाटील यांच्याकडे काही वर्षांपूर्वी केली होती परंतु या बँकेसाठी मुहूर्त मिळत नव्हता परंतु आज शेकाप आमदार श्री जयंत पाटील यांनी माथेरानला धावती भेट देत मध्यवर्ती बँकेसाठी जा-गेची पाहणी करून एक महिन्यांमध्ये ही बँक सुरु करणार अशी ग्वाही माथेरानकरांना दिली आपण ही बँक दोन वर्षांपूर्वी सुरु करायला हवी होती पण काही कारणास्तव त्यास वेळ गेला परंतु आता कोणत्याही परिस्थितीमध्ये एक महिन्यामध्ये बँक सुरु केली जाईल असा शब्द त्यांनी स्थानिकांना दिला यावेळी त्यांनी माथेरान पतसंस्थेस भेट दिली .../२



## राज्यात १३ हजार १६६ पशुधन उपचाराने लम्पी रोगमुक्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

२५ ऑक्टोबर अखेर ३२ जिल्ह्यांमधील एकूण ३०३० गावांमध्ये लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव दिसून आला आहे. बाधित गावांतील एकूण १४३०८९ बाधित पशुधनापैकी एकूण ९३१६६ पशुधन उपचाराने रोगमुक्त झाले असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिली.

श्री. सिंह म्हणाले, बाधित पशुधना-वर उपचार सुरु आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आज अखेर एकूण १४०.९७ लक्ष लस उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामधून एकूण १३५.५८ लक्ष पशुधनास मोफत लसीकरण करण्यात असून, जळगांव, अहमदनगर, धुळे, अकोला, औरंगाबाद, बीड, कोल्हापूर, सांगली, वाशिम, जालना, हिंगोली, नंदुरबार आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांमधील लसीकरण पूर्ण झाले आहे. खासगी संस्था, सहकारी दूध संघ आणि वैयक्तिक पशुपालकांनी करून घेत-लेले लसीकरण यांची आकडेवारीनुसार सुमारे ९७ टक्के गोवंशीय पशुधनाला लसीकरण झाले आहे.

श्री. सिंह म्हणाले, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठाने कीटकांच्या नियंत्रणासाठी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून राज्यात गोठ्यातील कीटक नियंत्रण, निर्जंतुकीकरण या महत्त्वपूर्ण बाबी पशुपालक व ग्रामपंचायती यांनी मोहीम स्वरूपात राबवण्यात याव्यात. शासकीय आणि खाजगी पशुवैद्यकांनी दिलेल्या सुधारीत उपचार .../२

## प्रथम क्रमांकाच्या राज्यस्तरीय दिवाळी अंकास ०१ लाख रुपये तर रायगड जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये

### राज्यातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शैक्षिणक, सामाजिक, कला. क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने २२ वी राज्यस्तरीय आणि रायगड जिल्ह-ास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली असून संपुर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने गेल्या २१ वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २२ वी स्पर्धा आहे.

नेहमीप्रमाणे यंदाही बक्षिसांच्या रक्कमेत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस ०१ लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार तर ततीय क्रमाकांस ३० हजार रूपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे. .../२

### उद्या अंक नाही

दैनिक रायगड नगरीच्या कार्यालयाला २६/१०/२०२२ रोजी बलिप्रतिपदा (पाडव्या) निमित्त कार्यालयाला सुट्टी असल्याने दि.२७/१०/२०२२ चा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचकांनी, जाहिरातदारांनी, वितरकांनी नोंद घ्यावी.

**-व्यवस्थापक**

## तेलीपाडा गावात वीजेची समस्या बनवली तीव्र

### ट्रान्सफार्मर न बसविल्यास वीज बिले न भरण्याचा ग्रामस्थांचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील तेलीपाडा गावात पूर्वी दोन ट्रान्सफार्मर होते. आता एकच ट्रान्सफार्मर असल्याने विजेची समस्या तीव्र बनली असून गावातील ग्रामस्थां तर्फे व ग्रामविकास मंडळ आणि ग्रामीण नळ पाणीपुरवठा व स्वच्छता समिती तेलीपाडा तर्फे सदर समास्या त्वरित सोडविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता राहुल शिंदे यांना निवेदन देण्यात आले आहे.

सध्या उरण तालुक्यात अनेक वेळा वीज येत आहे,जात आहे. त्यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे. असाच प्रकार उरण तालुक्यातील तेलीपाडा गावात घडत आहे. तेलीपाडा गावात एकच ट्रान्सफार्मर असल्यामुळे अनेकदा वीज जाते येते त्यामुळे फ्रिज टीव्ही असे विदयुत उपकरणांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. पूर्वी या ठिकाणी दोन ट्रान्सफार्मर होते तेव्हा सर्वकाही व्यवस्थित होते. मात्र दोन ट्रान्स फार्मर पैकी एक ट्रान्सफार्मर खराब झाल्याने तो दुरुस्तीसाठी .../२



# छत्रपती शिवाजी मंडळाच्या रंगावली प्रदर्शनाचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहरातील पाटील आळी मध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी मंडळाचे हे त्रेपन्नावे वर्ष आहे. गेल्या पंचावन्न वर्षात मंडळाने अनेक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा वारसा जपला आहे. गेल्या ४६ वर्षांपासून मंडळाच्या वतीने दीपावलीच्या दिवसांत रंगावली प्रर्शनाचे आयोजन करण्यात येते. उदयोन्मुख कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे हाच मंडळाचा हेतू आहे. हे प्रदर्शन २७ ऑक्टोबर पर्यंत पाहण्यासाठी मोफत खुले आहे.

मंडळाच्या सभागृहात रंगावली प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कर्जत नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय म्हसे, माजी अध्यक्ष अशोक शिंदे, गणपत दगडे, गजानन गुरव, मधुकर चंदन, राजन दगडे, अनिल शहा, संतोष गुरव आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे दत्तात्रेय म्हसे यांनी केले. माजी अध्यक्ष अशोक शिंदे यांनी प्रास्ताविकात मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

या प्रसंगी मार्गदर्शनपर मनोगतात अशोक ओसवाल यांनी 'कर्जत मधील रंगावली कलाकार पुणे - मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन आपल्या कलेचा ठसा उमटवतात ही कौतुकास्पद बाब आहे. आम्ही लहानपणापासूनच रंगवली प्रदर्शन पहात आलो आहे. गेल्या पंचावन्न वर्षांचा या मंडळाचा इतिहास आहे. आपण आरंभशूर आहोत असे हिणवले जाते. मात्र या मंडळाकडे पाहून याचा आदर्श इतरांनी ठेवणे गरजेचे आहे.' असें सांगितले. या प्रसंगी रंगवली स्पर्धेत पाचवी ते आठवी गटात प्रथम क्रमांक पटकावलेल्या कु. रक्षता कडव, द्वितीय क्रमांक मिळविलेल्या कु. निहारिका दगडे. नववी ते बारावी गटात प्रथम क्रमांक मिळविलेल्या कु. स्वरूप शेलवले, द्वितीय क्रमांक मिळविलेल्या कु. मानसी परदेशी यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी रंगावली कलाकारांचा सत्कार करण्यात आला. या प्रदर्शनात प्रसिध्द चित्रकार किसन खंडोरी यांनी सिंधुताई सकपाळ, राजेंद्र दगडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सविता शेलवले यांनी बाळासाहेब ठाकरे, अमित कांबळे यांनी मालकासिंग, प्रज्ञा पाटील यांनी लता मंगेशकर, आशिष गायकवाड यांनी राजू श्रीवास्तव, मनोज देशमुख यांनी साईबाबा यांची रंगवली साकारली आहे. प्रसिद्ध रंगावलीकार सुनील परदेशी यांच्या सह आलिशा जैन,नंदू तांडेल, सचिन सावंत, तनहा परदेशी आदी नवोदित कलाकारांनीही विविध विषयावरील रांगोळ्या साकारून प्रदर्शनात जिवंत पणा आणला आहे. हे प्रदर्शन २७ ऑक्टोबर पर्यंत पहाण्यासाठी मोफत खुले आहे.

# मनोहर भोईर यांचा बी पी सी एल कंपनीत नोकरीसाठी उपोषण करणाऱ्या अविनाश ठाकूर यांना पाठींबा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ येथील बी पी सी एल कंपनीसाठी जमीन संपादित करून सुध्दा नोकरी न देणाऱ्या बी पी सी एल कंपनीच्या अन्यायाविरोधात आमरण उपोषण करणाऱ्या अविनाश रमण ठाकूर यांच्या उपोषणास उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी मंगळवार दिनाकं २५ ऑक्टोबर २०२२ रोजी भेट देऊन जाहिर पाठींबा दिला आहे.

यावेळी शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे )उरण विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत , पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील,कामगार नेते भूषण पाटील, जेष्ठ कायदेतज्ज्ञ डी के पाटील, प्रा एल बी पाटील, विधी सेलचे तालुका अध्यक्ष मच्छिंद्र घरत, युवासेनेचे अवचित राऊत, गौरव म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस विकास नाईक,रमाकांत म्हात्रे, महिला तालुका अध्यक्ष सिमा घरत, डोगरी शाखाप्रमुख सचिन पाटील, आनंदनगर शाखाप्रमुख मणीराम पाटील, विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

अविनाश ठाकूर यांना सर्वच राजकीय पक्षांनी जाहीर पाठिंबा दिला असून त्याला बीपीसीएल कंपनीने त्वरित कामावर घ्यावे अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

# मुरुडच्या पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाने केली आदिवासींची दिवाळी गोड



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाने विहूर गावातील आदिवासी वाडी येथे दिवाळी फराळ वाटप केले.यावेळी येथील आदिवासी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असल्याचे चित्र दिसून आले !

मुरुड येथील समुद्र किनारी व्यवसाय करणाऱ्या स्टॉल धारक यांनी स्थापन केलेल्या पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत.त्याचाच भाग जवळपासच्या विहूर येथील आदिवासी बांधवांना मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांच्या पुढाकारातून दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षे याठिकाणी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याबद्दल व फराळ वाटप करण्यात आल्याने आदिवासी वाडीतील मुलांची दिवाळी गोड झाली.अशी प्रतिक्रिया स्थानिक बांधवांनी व्यक्त केली. यावेळी पद्मदुर्ग मंडळ अध्यक्ष अरविंद गायकर, सहसचिव दामोदर खारगावकर, सदस्य महेंद्र पाटील, संतोष मयेकर आदी.मान्यवर उपस्थित होते.

# करंजाडेमधून बॅटऱ्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नव्याने उभारण्यात येणाऱ्या विद्यूत सबस्टेशन च्या कामाच्या साईट वरील रूम मध्ये ठेवलेल्या जवळपास एक लाख चोवीस हजार रुपये किमतीच्या बासष्ठ बॅटर्यांची चोरी झाल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे. करंजाडे सेक्टर ६ या ठिकाणी विद्युत सबस्टेशन उभारण्याचे काम सुरु असून तेथील साईट वरील रूम मध्ये ठेवलेल्या जवळपास एक लाख चोवीस हजार रुपये किमतीच्या बासष्ठ बॅटर्यांची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे फराळाचे वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

कोकणचे युवा नेतृत्व, विधानपरिषदेचे आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरण तालुका युवक राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे जिल्हा परिषदेचे मराठी शाळा,डाऊर नगर, उरण येथे समाजातील उपेक्षित घटकांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी शेकडोच्या संख्येने महिला, पुरुष व लहान मुले उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन उरण युवक तालुका अध्यक्ष कैलास भोईर यांनी केले होते. यावेळेस सुमारे ५०० लोकांना दिवाळी निमित्त फराळाचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उरण युवक तालुकाध्यक्ष कैलास भोईर हा अतिशय चांगला कार्यकर्ता असून त्याने सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम उरण तालुक्यात राबविले आहेत.

उरण तालुक्यात पक्षाची युवक संघटना चांगल्या पद्धतीने त्याने बांधली आहे. मा. अनिकेतभाई तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी हा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल त्यांचे मनाप–ासून अभिनंदन व्यक्त करतो. आगामी होणाऱ्या पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे कैलास भोईर हेच पंचायत समितीचे पक्षाचे उमेदवार असतील. त्यांना पक्षाचा नेहमी पाठिंबा राहील.

त्यांच्या पत्नी किंजलताई यांनाही पक्षाचा नेहमी पाठिंबा राहील.असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील यांनी उपस्थित सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना तसेच उपस्थित महिला भगिनीं व नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस भावनाताई घाणेकर, जिल्हा उपाध्यक्ष ड. भार्गव पाटील, जिल्हा सरचिटणीस पुखराज सुथार,युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे,सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष मंगेश कांबळे, सचिन पाटील, राकेश पाटील, चाणजे ग्रामपंचायत सदस्या किंजलताई कैलास भोईर आदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुधीर पाटील यांनी केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषि कृती विकास आराखडा तयार करणार : मुख्यमंत्री

सर्वांना ग्वाही देतो की, तुम्ही धीर सोडू नका, खचू नका..आम्ही तुमच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहोत. राज्यातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आणि त्याची तातडीने अंमलबजावणी केली. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत एकाच वेळी ७ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २५०० कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम जमा करण्यात आली. सेंद्रीय शेतीवर भर देतानाच विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांना मंजूरी देऊन लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. शेतकरी आणि कृषि विकासासाठी घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

शेतकरी बांधवांनी पारंपारिक शेतीला आधुनिकतेचे बळ देऊन कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी शेती करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. बळीराजाला चांगले दिवस येवू दे अशी प्रार्थना करीत मुख्यमंत्र्यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रातिनिधीक स्वरूपात दुधे दाम्पत्याला दिवाळी फराळ भरवला. वर्षावरील हिरवळीवर शेतकऱ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे त्यांचे सुपुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे प्रत्येक शेतकऱ्याची जातीने विचारपूस करीत होते. यावेळी अमरावतीच्या सौ. अर्चना सवाई आणि अहमदनगरचे सतीष कानवडे या शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी प्रास्ताविक केले. आमदार सर्वश्री प्रताप सरनाईक, प्रवीण दरेकर, माजी खासदार आनंद अडसुळ यांच्यासह सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, मदत व पुर्नवसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरजकुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे आदी उपस्थित होते.

## महाविकास आघाडीचे नेते होणार सक्रिय सहभागी

रायगड जिल्हा सल्लागार तथा प्रवक्ते बबन दादा पाटील यांना देण्यात आले तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुदाम गोकुळशेठ पाटील यांना देखील आंदोलनाचे पत्र अभिजीत पाटील यांनी दिले. स्वतः अभिजीत पाटील हे काँग्रेस पक्षाचे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष असून काँग्रेस पक्ष देखील पनवेल प्रवासी संघाच्या आंदोलनात अग्रस्थानी असेल असे त्यांनी सांगितले. बबन दादा पाटील म्हणाले की मी कार्यकर्त्यांच्या फौजेसह हिरीरीने या आंदोलनात सहभागी होणार आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची संपूर्ण ताकद पनवेल प्रवासी संघाच्या आंदोलनापाठी असेल अशी ग्वाही सुदाम पाटील यांनी दिली. भाजपा, बाळासाहेबांची शिवसेना अशा सत्ताधाऱ्यांसह सर्वच राजकीय पक्षांना पनवेल प्रवासी संघाने या आंदोलनाबाबत सूचित केले आहे. तसेच सिटीजन युनिटी फोरम, ग्राहक संरक्षण मंच, पनवेल संघर्ष समिती, ज्येष्ठ नागरिक संघ यांसारख्या सामाजिक संस्थांना देखील सदर आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आल्याचे समजते.

कोकण विभाग आणि मुंबई विभागाला जोडणारे अत्यंत महत्त्वपूर्ण राज्य परिवहन मंडळाचे स्थानक म्हणून पनवेल अधोरेखित झालेले आहे. बांधा व हस्तांतरित करा धरतीवर महाराष्ट्रात पाच ठिकाणी स्थानक संकुल उभारण्यात येणार आहे. तूर्तास पनवेल स्थानकातून दररोज ४००० बस गाड्यांची ये जा होत असते. येथील कर्मचारी देखील जीव मुठीत घेऊन धोकादायक इमारतीमध्ये सध्या काम करत आहेत. प्रवाशांसाठी निवारा शेड अपुऱ्या आहेत, ज्या शेड आहेत त्या फुटक्या गळक्या असल्यामुळे पावसाळ्यात वापरण्याजोग्या रहात नाहीत. एकुलत्या एक सार्वजनिक शौचालयात दुर्गंधीचे साम्राज्य नेहमी पसरलेले असते. अस्वच्छता तर पाचवीला पुजलेली असते. स्थानक आवारामध्ये खड्ड्यांचे राज्य पसरले आहे. या असुविधांमुळे प्रवासी नागरिकांना विनाकारण जाच सहन करावा लागत आहे. स्थानक संकुल उभारणी सोबतच प्रवाशांच्या उपरोक्त असुविधाना देखील प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचा पनवेल प्रवासी संघाचा उद्देश असणार आहे.

## माथेरानमध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक सुरू करणार : आ.जयंत पाटील

व पतसंस्थेच्या कामकाजाची माहिती घेत पतसंस्थे स लागणारे भांडवल उभे करण्याकरिता आपण नेहमीच पुढाकार घेऊ व पतसंस्था आणि रायगड बँक यांच्या संयुक्त माध्यमातून माथेरानकरांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करू असे यावेळी सांगितले शेकाप चे स्वर्गीय नेते भाऊसाहेब राऊत यांनी स्थापन केलेल्या पतसंस्थेस सर्वतोपरी सहाय्य केले जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांची संवाद साधताना येथील समस्या ही जाणून घेतल्या व राजकारण विरहित सर्वांनी एकत्र येऊन माथेरानच्या विकासासाठी प्रयत्न करावे व त्यासाठी आपण सदैव उपस्थित असो माथेरानच्या प्रश्नासाठी विधानसभेमध्येही आपण वाचन करायला साथ देऊ असेही त्यांनी सांगितले यावेळी माथेरान शेकाप अध्यक्ष शफिक बडाने, रमाकांत तोरणे, उमेश कदम माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, अजय सावंत, विवेक चौधरी खोपोलीचे कपिल पाटील, संतोष जंगम व अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## राज्यात ९३ हजार १६६ पशुधन उपचाराने लम्पी रोगमुक्त

प्रोटोकॉलप्रमाणे उपचार करावेत. शासकीय अधिकाऱ्यांनी पशुपालकांकडे जाऊन औषधोपचार व लसीकरण करावे, शासनाकडून मोफत औषधोपचार व लसीकरणाचे नियोजन करण्यात आले असल्यामुळे सर्व पशुपालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या पशुधनावर उपचार करून घेण्यासाठी सहकार्य करावे.

## राज्यस्तरीय दिवाळी अंकास ०१ लाख रुपये....

त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कष्ट कथेसाठी ०७ हजार रूपये, उत्कष्ट कविता, उत्कष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ट विशेषांक व उत्कृष्ठ मुखपृष्ठ यांना प्रत्येकी ०५ हजार रुपये, त्याचबरोबर बालसाहित्याच्या सवोत्कष्ट अंकास ७५०० रूपये तसेच रायगड जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रूपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रूपये आणि ततीय क्रमाकांस १० हजार रूपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ०५ हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठया संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रूपये प्रवेश फीसह २० नोव्हेंबर २०२२ पर्यत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

## तेलीपाडा गावात वीजेची समस्या बनवली तीव्र

महावितरण कंपनीने कार्यालयात नेले होते मात्र दिड महिने उलटूनही दुरुस्ती साठी नेलेला ट्रान्सफार्मर महावितरण कंपनीने दुरुस्त केला नाही किंवा नविन ट्रान्सफर्मर तेलीपाडा येथे बसविला नाही. सध्या तेलीपाडा येथे एकच ट्रान्सफार्मर असून संपूर्ण गावाचा वीजेचा लोड या एकाच ट्रान्सफार्मरवर पडत आहे. यामुळे नागरिकांच्या घरातील लाईट कमी जास्त होणे किंवा लाईट येणे जाणे असे प्रकार घडत असून याचा सर्वाधिक फटका टीव्ही,फ्रिज या विदयुत उपकरणांना बसत आहे. ही उपकरणे बंद पडत आहेत. यामुळे ग्रामस्थांना आर्थिक नुकसानाला सामोरे जावे लागत आहे. वारंवार लाईट गेल्याने वारंवार आर्थिक नुकसानाला ग्रामस्थांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे कोणतेही वादविवाद होउ नयेत व ग्रामस्थांचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी महावितरण कंपनीने पुढाकार घेऊन पूर्वी दुरुस्तीसाठी नेण्यात आलेला ट्रान्सफॉर्मर लवकरात लवकर दुरुस्त करून गावात बसवावा किंवा त्या जागी नविन ट्रान्समार्फर लावावा अशी मागणी ग्रामविकास मंडळ आणि ग्रामीण नळ पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तेलीपाडा तर्फे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उरण कार्यालयात करण्यात आले आहे. सदर समस्या बाबत कार्यकारी अभियंता पनवेल, उरणचे तहसिलदार भाउसाहेब अंधारे, उरणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील, चाणजे सरपंच अमित भगत यांनाही पत्रव्यवहार करून ही समस्या सोडविण्याची मागणी केली आहे. जर ही समस्या सूटली नाही तर गावातील कोणतेही व्यक्ती वीज बील भरणार नाही आणी भविष्यात कोणतेही वादविवाद किंवा समस्या उद्भवल्यास त्यास सर्वस्वी महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी जबाबदार राहिल असे संतापलेल्या नागरिकांनी महावितरण कंपनीला निवेदन देताना सांगीतले.

या समस्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उरण कोटनाका या कार्यालयात सहाय्यक अभियंता राहुल महादेव शिंदे यांना निवेदन देण्यात आले. व ही समस्या त्वरित सोडविण्याची मागणी करण्यात आली. यावेळी तेलीपाडा अध्यक्ष दत्ताराम म्हात्रे, उपाध्यक्ष प्रशांत पाटील , ग्रामपंचायत सदस्य अजय म्हात्रे, कैलास म्हात्रे, प्रल्हाद म्हात्रे, मंगेश म्हात्रे, विरेंद्र घरत, राजेंद्र म्हात्रे, ईश्वर म्हात्रे, नितिन म्हात्रे, शाम म्हात्रे, दिपराज म्हात्रे आदि तेलीपाडा गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# खोपटा - कोप्रोली रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या न सुटल्यास मनसेचा गेट बंद आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

खोपटा – कोप्रोली रस्त्यावर रोज वाहतूक कोंडी होत असल्याने अशा वाहतूक कोंडी संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत, तालुका उपाध्यक्ष दिपक पाटील यानी आक्रमक भूमिका घेतली आहे.सदर वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी संबंधित प्रशासनाने ठोस उपाययोजना न केल्यास येत्या १५ दिवसांत महाराष्ट्र नवनिर्माण सेना गेट बंद आंदोलन करणार आहे असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

खोपटा ( बाधपाडा ) कोप्रोली ग्रामपंचायत हद्दीतील ट्रान इंडिया, कॉन्टिनेटल ,अमेया लॉजीस्टिक , न्यू ट्रान्स इंडिया, विरगो, ग्लोबीकॉन, आल कार्गो, कॉरवान परिसरातील सी एफ एस चे व्यवस्थापन हे कस्टम बॉड च्या क्षमते पेक्षा कंटेनर हाताळणी करीत आहेत. सदर यार्ड मधिल व्यवस्थापन हे कस्टम च्या नियमांना हारताळ फासून, दुर्लक्ष करत आहेत. अशा बेशिस्त, अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे खोपटा कोप्रोली रस्त्यावर वाहतूक कोंडी ची समस्या निर्माण होत आहे.त्यातच सदरची वाहने ही ४ ते ५ तास रस्त्यावर उभी राहत असल्याने उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडी चा त्रास हा सर्व सामान्य जनतेला सणाच्या दिवशी रोज सहन करावा लागत आहे.

अशा वाहतूक कोंडीतून सर्व सामान्य जनतेला मोकळा श्वास घेता यावा यासाठी मनसेचे उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील पाटील, उरणचे तहसिलदार तथा दंडाधिकारी भाऊसाहेब अंधारे यांच्या सोबत चर्चा करून शासकीय नियमांची पायमल्ली करणाऱ्या मुजोर कंपनी व्यवस्थापनावर गुन्हा नोंदवून कारवाई करण्यात यावी यासाठी निवेदनही दिले.न पेक्षा गेट बंद आंदोलन उभारण्यात येणार असा ही इशारा देण्यात आला आहे.

# म्हसळ्यात रंगली भव्य किल्ले बांधणी स्पर्धा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिवाळी सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आणि छ. शिवाजी महाराज यांचा आदर्श, दिवाळी सण आणि किल्ले स्पर्धा यांचे नाते अतूट व्हावे हा दृष्टीकोन समोर ठेऊन गर्जा प्रतिष्ठान म्हसळा चे संस्थापक तसेच सुप्रसिद्ध व्याख्याते सचिन कमळाकर करडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी म्हसळा शहरात किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात येते.

याही वर्षी कलाकारांना आपल्या कलेस वाव मिळावा या दृष्ठिने गर्जा प्रतिष्ठान च्या विद्यमाने किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत लहान आणि मोठे गटात स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.अनेक स्पर्धाकांनी सहभाग घेऊन स्पर्धा तशस्वी पार पडल्या. गर्जा प्रतिष्ठान चे संस्थापक सचिन करडे, सौ. करडे, विशाल सायकर, कौस्तुभ करडे आणि संस्थेच्या सभासदांनी सर्व किल्यांचे परीक्षण केले.

# मोकाट गुरांचा रास्ता रोको ; वाहनचालकांची होतेय कसरत

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

शिहू नागोठणे पोयनाड रस्त्यावर ठिय्या मांडून बसणारी व रास्ता रोको करणारी मोकाट गुरे प्रवाशी, वाहनचालक व नागरिकांसमोर डोकेदुखी ठरत आहे. हा मार्ग वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्व–ाचा मार्ग आहे. या मार्गावरुन सातत्याने वाहनांची वर्दळ सुरु असते. आजवर रस्त्यातील जिवघेण्या खड्ड्यांमुळे हा मार्ग नेहमीच चर्चेत राहिला आहे. अशातच या मार्गावर मोकाट गुरांचा सातत्याने जनू रास्ता रोको होत असल्याने वाहनचालकांसह प्रवाशी अक्षरशः हैराण झाले आहेत. मोकाट गुरांचे जथ्थे दिवसा व रात्री या मार्गाच्या मधोमध ठाण मांडत असल्याने जिवघेण्या अपघाती घटनांना निमंत्रण मिळत आहे. या मार्गावर रस्त्यात बसलेल्या गुरांना धडकून अनेकदा अपघाती घटना घडल्या आहेत. त्यामुळे गुरे मालकांनी आपापली गुरे मोकळी न सोडता त्यांची योग्यप्रकारे निगा राखावी अशी मागणी प्रवाशी व वाहनचालकांमधून जोर धरत आहे. शिहू नागोठणे परिसरात मोकाट गुरांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या मार्गावरील मोकाट गुरांची वाढती समस्या डोकेदुखी ठरत आहे. भररस्त्यात ही गुरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतुक कोंडीची समस्या देखिल निर्माण होताना दिसत आहे. तर रात्रीच्या वेळी मोटारसायकलस्वार व वाहनचालकांना रस्त्यात बसलेली गुरे दिसत नसल्याने अनेकदा अपघाती घटना घडल्या आहेत. तसेच अवजड वाहनांच्या धडकेत गुरांचा बळी जाण्याची देखिल शक्यता असते. अशातच वाहनचालकांनी कितीही हॉर्न वाजविला तरी मोकाट गुरे जागची हालत नसल्याने यातून वाट कशी काढायची असा प्रश्न वाहनचालकांसमोर उभा राहत आहे. मोकाट गुरांचे मालक व शेतकरी गुरांचा वापर करून काम झाल्यावर बेफिफिकरपणे वागत आहे. रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्ग, पाली खोपोली महामार्ग, खोपोली पेण अलिबाग मार्ग, शिहू नागोठणे पोयनाड तसेच वाकण पाली खोपोली मार्गावर मोकाट गुरांची समस्या गंभीर झाली आहे. सदर मार्ग प्रवास व वाहतुकीच्या दृष्टीने सुरक्षित असावा याकरीता मालकांनी आपली गुरे मोकाट सोडू नयेत. याबरोबरच शासनप्रशासनाने देखिल रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी जनमाणसातून जोर धरत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# जेएनपीए बंदरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छता जागरूकतेवर भर

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जेएनपीए मध्ये 'विशेष स्वच्छता मोहीम २.०' राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश्य 'स्वच्छ भारत २.० मोहिमे अंतर्गत समाजामध्ये स्वच्छतेचे महत्व व त्याचे विविध पैलू याबाबत जागरूकता निर्माण करणे आहे. संपूर्ण मोहिमेदरम्यान स्वच्छतेचे महत्व यावर भर देण्यात आला.

'विशेष स्वच्छता मोहीम २.०' राबविण्या मागील मुख्य उद्देश्य स्वच्छता, सुशासन, अनुपालनाचे ओझे कमी करणे आणि जीवन सुलभ करणे यास प्रोत्साहन देणे हे आहे. केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या अखत्यारीतील देशातील सर्व प्रमुख बंदरे व अधीनस्थ कार्यालये आपली कार्यालये आणि कार्यालयीन परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आणि स्वच्छतेमध्ये सुधारणा करण्यासाठी विविध प्रयत्न करत आहेत.



स्वच्छता मोहिमेचा एक भाग म्हणून जेएनप–ीएने बंदर व आसपासच्या परिसराची स्वच्छता केली. यापूर्वी, बंदर परिसर स्वच्छ आणि हिरव–ागार ठेवण्यासाठी जेएनपीएचे कर्मचारी आणि भागधारकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वच्छता पखवाडा सुद्धा आयोजित करण्यात आला होता, ज्यामुळे देशाच्या स्वच्छतेचे एकंदर उद्दिष्ट साध्य होण्यास मदत झाली. हरित आणि स्वच्छ पर्यावरणास चालना देण्यासाठी जेएनपीए मध्ये ई–वाहनांचा वापर देखील सुरू करण्यात आला आहे.

जेएनपीएने टाउनशिप, हॉस्पिटल, गेस्टहाऊस, बल्क ऑफिस एरिया, प्रशासन इमारत, मुख्य जेट्टी क्षेत्र, लँडिंग जेट्टी, आयसीडी ऑफिस, लिक्विड कार्गो जेट्टी, रस्ते आणि जवळपासच्या विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

## संक्षिप्त...

### पनवेल तालुका पोलिसांनी केला गावठी दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने दोन वेगळ्या ठिकाणी टाकलेल्या छाप्यात गावठी हात भट्टी दारूचा साथ हस्तगत केला आहे,

तालुक्यातील कातकरी वाडी चेरेवली येथील दोन वेगवेगळ्या ठिकाणी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दैडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद फडतरे, पोलीस उपनिरीक्षक गजानन टाकळे, पोहवा संतोष चिकणे आदींच्या पथकाने छापा टाकून एका ठिकाणाहून ७०० रुपये किमतीचा गावठी हात भट्टीचा दारुचा साठा हस्तगत केला आहे, तर याच पथकाने दुसऱ्या ठिकाणी छापा टाकून जवळपास एक हजार रुपये किमतीचा गावठी हात भट्टी चा साठा हस्तगत केला आहे या दोन छाप्या मुळे बेकायदेशीर रित्या गावठी दारू विक्री करणाऱ्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

### उप जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दाऊदी बोहरा जमात पनवेल रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन रोटरॅक्ट क्लब आणि इनरव्हील क्लबच्या पनवेल डॉ. नानासाहेब धर्माधिकारी रुग्णालय (पनवेल उप जिल्हा) रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आमिल मुर्तजा, साहेब हसनी, पनवेल महानगरपालिकेचे मा.नगरसेवक राजू सोनी, शं.अलियासगर, सैफुद्दीन, कल्पेश परमार, हितेश राजपूत, रोटरी सदस्य कल्पना नांदगावकर, इनरव्हील सदस्य मुस्तफा वोहरा, आणि हॉस्पिटलचे डॉ. सकपाळ व त्यांचे सहकारी तसेच बोहरा समाज बांधव उपस्थित होते. यावेळी ५४ फळांच्या पाकिटांचे वाटप करण्यात आले.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कर्जत रोटरी क्लबचा दिवाळी सण आदिवसी बांधव, गोर गरीब, अनाथ व निराधारां सोबत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

दिवाळी सणा दरम्यान सर्वत्र आनंद साजरा होत असताना समाजातील अर्थिक विवंचनेत असलेले गरीब कुटुंब,निराधार मुल,व्यक्ती ह्या आनंदापासून दूर असतात त्या सर्वांना देखील आनंद घेता यावा त्यांची दिवाळी गोड व्हावी या उद्देशाने रोटरी क्लब कर्जतच्यावतीने त्यांच्या समवेत दिवाळी साजरी करण्यात आली.

रोटरी क्लब अध्यक्ष सतीश श्रीखंडे व सेक्रेटरी विशाल शहा व सर्व सदस्य यांनी आपली दिवाळी सणानिमित्ताने असणारी व्यवसायिक कामे बाजूला ठेऊन वसुबारस दिवाळीच्या पहिल्या दिवसा पासून आजूबाजूच्या डोंगर भागातील काही आदिवासी वाडयांमध्ये व इतर गरजू घटकांपर्यंत पोहचून तेथील सर्व कुटुंबाना फराळ, लाडू , महिलांसाठी साड्या, सुगंधी उठणे, मुलांना फटाके आदी वस्तूंचे वाटप करण्यात आले, त्यांची विचारपूस, करून त्यांच्याशी गप्पा मारल्या व त्यांना शुभेच्छा दिल्या.

सतीश श्रीखंडे यांनी दिवाळी सण व आपल्या संस्कृतीचे महत्व सांगितले प्रत्येक समाज घटकांमध्ये समतोलता,समानता, उत्पन, नियोजन व प्रगती या बाबत संवाद साधला .ह्या मध्ये मुख्यत्वे हालिवली आदिवासी वाडी, किरवली, सावरगाव व इतर आदिवासी वाड्यांमध्ये प्रत्येक्षात जाऊन तेथील प्रत्येक कुटुंबातील बांधवांपर्यंत हा दिवाळीचा आनंद वाटप करण्याचा प्रयत्न केला,

तसेच कर्जत शहरातील रिमांडहोम, शासकीय महिला वसतिगृह, नेरळ येथील मुलींचे आसरा सुरक्षा शेल्टर येथील निराधार मुले, महिला व मुली यांनाही तहसील कार्यालय कर्जत यांच्या सोबत कपडे, मिठाई, फराळ व आदी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या वेळी नायब तहसीलदार सचिन राऊत, नायब तहसीलदार एस. आर.बाचकर उपस्थित होते. रो. अध्यक्ष सतीश श्रीखंडे यांच्या नेतृत्वामध्ये ह्या वर्षी रोटरी क्लब च्या माध्यमातून मोठया स्वरूपाचे विविध उपक्रम घेण्यात आले, याप्रसंगी सेक्रेटरी विशाल शहा, रो.जितेंद्र ओसवाल, रो.योगेश राठी, रो हुसेन जमाली,रो अरविंद जैन, डॉ.आदित्य जंगम, रो सुजित भोईर उपस्थित होते.



# वाढीव आकारलेले मालमत्ता कर रद्द करण्याची ११ गाव पंचक्रोशी संघर्ष समितिची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका हद्दीतील वाढीव आकारलेले मालमत्ता कराचा मुद्दा पेटु लागलेला आहे. वाढीव आकारलेले मालमत्ता कर रद्द करावा आणि गावात २०१४ पूर्वी ग्रामपंचायत कर अस्तित्वात होता तोच ग्रामपंचायत कर आकारावा अशी मागणी ११ गाव पंचक्रोशी संघर्ष समितिने आयुक्तांची भेट घेऊन मागणी केली आहे.

यावेळी माजी सरपंच पवन कदम–धानसर, माजी सरपंच रवींद्र पाटील, सुभाष पाटील–रोहिंजन, जनार्दन पाटील, लहू पाटील,वासुदेव पाटील, जगन्नाथ मढवी, प्रभाकर मढवी–करवले, सोमनाथ भोईर, वामन भोईर, हरिश्चंद्र भोईर तुर्भे, एकनाथ म्हात्रे, गणेश म्हात्रे –खुटारी, जनार्दन पाटील –किरवली, भगवान पाटील, विलास पाटील–धरणा, वासुदेव पाटील, लक्ष्मण पाटील, संतोष म्हात्रे– पिसार्वे, एड. विजय गडगे उपस्थित होते.

महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी गावात प्रशासकाची नेमणूक केली होती. त्या शासन नियुक्त प्रशासकाने गावांमध्ये ग्रामसभा घेऊन ग्रामसेवक याने २०१६ रोजी पत्राचे वाचन केले. ग्रामसेवकाने वाचन केल्यानंतर ग्रामसभेत उपस्थित असलेल्या सर्वांनी पनवेल महानगरपालिकामध्ये आपल्याला समाविष्ट व्हायचे नाही असे स्पष्ट सांगितले होते. तरीही या गावाना महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करून घेतले. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रतिबद्ध असताना सुद्धा असे न करता महानगरपालिकेने मालमत्ता कर वाढवण्याचे ठराव मंजूर करून मालमत्ता कर वाढवून लोकांना बिले दिली आहेत. गावातील ग्रामस्थांना उपजीविकेचे साधन व स्तोत्र उपलब्ध राहिले नाहीत. त्यामुळे मालमत्ता कर कसे भरावे हे आमच्या गावातील ग्रामस्थां समोर प्रश्न उपस्थित राहिलेला असल्याचे पंचक्रोशी संघर्ष समितीने आयुक्तांसमोर मांडले.

महानगरपालिकेने दिलेल्या नोटीस मध्ये नमूद मालमत्ता कर हे नागरिकांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे ते भरता येणे शक्य नाही. मालमत्ता कर वाढवून २०१६ ते २०२२ रोजी पर्यंतचा कर सुद्धा भरण्यास पालिका सांगत आहे. हे चुकीचे असून ते आम्हाला मान्य व कबूल नसल्याचे समितीच्या सदस्यानी सांगितले. तसेच गावात २०१४ पूर्वी ग्रामपंचायत कर अस्तित्वात होता तोच ग्रामपंचायत कर जर पनवेल महानगरपालिका कायम करत असेल तर स्वागत करू, अन्यथा कर भरणार नाही असा पवित्रा ११ गाव पंचक्रोशी संघर्ष समितीने घेतला आहे. यावेळी आयुक्त यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली असल्याची माहिती माजी सरपंच आणि समितीच्या सदस्यांनी दिली.

## कोमसाप मुरुड-जंजिरा शाखेतर्फे दिवाळी पहाट

# आठवणींची दीप-संध्या मैफिलीने केले रसिकजनांना मंत्रमुग्ध

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड शाखेतर्फे उषा खोत यांच्या निवासस्थानी दिपावली निमित्त दिवाळी पहाट साजरी करण्यात आली.पहाटवेळेस बहारदार आठवणींच्या दीप–संध्या मैफिलीने तमाम रसिकांजनांना मंत्रमुग्ध केले !



को.म.साहित्य परिषदेचे मुरुड–जंजिरा शाखाध्यक्ष संजय गुंजाळ, कार्याध्यक्ष अरुण बागडे, ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ. रवींद्र नामजोशी, सचिव नैनिता कर्णिक, उपाध्यक्षा उषा खोत, प्रशासनाधिकारी दीपाली दिवेकर यांनी दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून आठवणींची दिप संध्या मैफिलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी सौ उषा खोत यांच्यातर्फे सुवर्ण चंपक देऊन उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर आठवणी कथन, काव्यवाचन, काव्यगायन, गप्पा, गाणी अशा मुक्त मैफिलीला सुरुवात झाली.

सदर मैफिलीची सुरुवात अरुण बागडे यांनी गणेश वंदनेनी करण्यात आली. यानंतर शास्त्रीय मैफिलिची सुरेल सुरुवात शास्त्रीय संगीत गायिका प्रतिभा मोहिले यांनी केली त्यानंतर हाच शास्त्रीय संगीताचा माहोल जेष्ठ शास्त्रीय गायक डॉ.रवींद्र नामजोशी यांनी शास्त्रीय संगीत विषयक माहिती देत तसेच अधून मधून गाणी ऐकवत पुढे नेला. अमोद पाटील यांच्या बासरी वादनाने सुरेल माहोल बनविला. आझादी का अमृत मोहा–त्सव या केंद्र सरकारच्या मोहोमेअंतर्गत २१००० हजार किलोमीटर अंतर ७५ दिवस बाईकवरून यशस्वीरित्या पार करणाऱ्या प्रसाद चौलकर यांचा शाखेच्या वतीने संजय गुंजाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर प्रसाद चौलकर, ओवी पाटील, स्वरांगी पेंडसे यांनी देखील गाणी सादर केली. गीतगायना नंतर काव्य व अभिवाचनाचे सत्र सुरु झाले. ह्या सत्रात रुद्धी भगत, शिवानी सुभेदार, नैनिता कर्णिक, ओम जोशी, प्रतिभा जोशी, श्रुती मसाल, शिवम चव्हाण, प्रसाद चव्हाण, आशुतोष कर्णिक, दीपाली दिवेकर, प्रसाद चौलकर, आशिष पाटील, योगेश दवटे, सिद्धेश लखमदे यांनी कविता, अभिवाचन व अनुभव कथन करून उपस्थितांची मने जिंकली. संजय गुंजाळ यांनी नटसम्राट नाटकातील सादर केलेल्या प्रसंगाने सर्वांचे डोळे पाणावले.

प्रतीक कातारे यांनी काढलेल्या रांगोळीचे सर्वांनी कौतुक केले. आठवणींची दीप–संध्या मैफिलीचे सूत्रसंचालन अस्मिता पेंडसे मॅडम यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सिद्धेश लखमदे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# चार गावांना मिळाले हक्काचे खेळाचे मैदान; चिंचपाडा गाव ग्रामस्थांचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा या गावांचे नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी स्थलांतर करण्यात आले. यावेळी या गावांना हक्काचे मैदान मिळावे यासाठी ग्रामस्थांचा सातत्याने सिडकोकडे पाठपुरावा सुरु होता. मात्र सिडकोने चिंचपाडा विठ्ठलवाडी समोरील मैदान देण्यात आले आहे. या मैदानाला चिंचपाडा गावाचे सामाजिक कार्यकर्ते कै.विठ्ठल चाहु केणी (व्ही.सी) यांचे नाव देत या नावाच्या नामफलकाचे अनावरण आज जेष्ठ माजी क्रिकेट खेळाडू सुरेश महादेव केणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चिंचपाडा ग्रामस्थ व युवा तरुण, क्रिकेट पट्टू मोठ्या संख्येने उपस्तित होते.



राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा असलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील १० गावांतील जमिनींचे संपादन करून विकसित करण्यात येत आहे. त्याचबरोबर चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा या प्रकल्पबाधित गावांतील ग्रामस्थांचे स्थलांतर येथील पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रात करण्यात आले आहे. मात्र पूर्वी गाव होते व गावाबाजूलाच मैदान असल्याने त्या मैदानामध्ये खेळण्यासाठी जागा होती. मात्र आता पुनर्वसन झाल्यानंतर खेळ खेळण्यासाठी मैदानाची उणिवा तरुणांना व ग्रामस्थांना भासत होती. यावेळी येथील ग्रामस्थांनी सिडकोकडे आम्हाला खेळण्यासाठी मैदानाची आवश्यकता असल्याने लवकरात लवकर मैदान मिळावे यासाठी येथील ग्रामस्थांनी सिडकोकडे पाठपुरावा सुरु होता. अखेर चिंचपाडा विठ्ठलवाडी समोर सिडकोने खेळाचे मैदान आरक्षित केले.

त्यानुसार त्या मैदानाचे कामही प्रगतीपथावर आहे. यावेळी चिंचपाडा ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन गावातील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे कै.विठ्ठल चाहु केणी (व्ही.सी) यांचे नाव या मैदानाला द्यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार आज चिंचपाडा ग्रामस्थ विठ्ठलवाडी समोरील मैदानाच्या प्रवेशद्वारावर कै.विठ्ठल चाहु केणी (व्ही.सी) मैदान नामफलकाचे अनावरण चिंचपाडा गावातील प्रतिष्ठित जेष्ठ माजी क्रिकेट खेळाडूं सुरेश महादेव केणी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी चिंचपाडा गावातील जेष्ठ नागरिक, माजी खेळाडू, युवा खेळाडू त्याचबरोबर ग्रामस्थ उपस्तित होते.

# सामाजिक बांधिलकीतून विद्यार्थ्यांना अन्नदान व शैक्षणिक साहित्य वाटप



**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहर कोळी (बामण डोंगरी) आणि अक्षय ठाकूर (केळवणे) यांच्याकडून रा.जि.प.शाळा कडापे आणि रा.जि.प.शाळा पूनाडेवाडी येथील इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व मुलांसाठी स्नेहभोजन, दिवाळी स्वीट शालेय गणवेश, शैक्षणिक साहित्य, यांचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत सामाजिक भावनिक विकास व्हावा, आपण ज्या समाजामध्ये राहतो त्या समाजातील वंचित घटकासाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही भावना मुलांमध्ये रुजावी यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

विशेष म्हणजे वाडीवरील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हा काही वेगळाच होता.या उपक्रमासाठी कडापे शाळेचे मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे , पुनाडे वाडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप पाटील ,कडापे शाळेचे उपशिक्षक रमेश पाटील त्याप्रमाणे शाळा कमिटीचे सदस्य आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कडापे शाळेतील उपशिक्षक रमेश पाटील यांनी सर्वांचे स्वागत करून जवाहर कोळी आणि अक्षय ठाकूर त्याचप्रमाणे सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# जुन्या मुंबई-पुणे रस्त्यांवर महानगर गॅस कंपनीकडून खोदण्यात आलेली माती देत आहे अपघाताला आमंत्रण

## जागोजागी रस्ते खोदून रस्त्यांची होत आहे नादुरुस्ती

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्गांवर गेल्या वर्षाभरापासून महानगर गॅस कंपनीकडून पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी जेसीबी मशीनच्या सहाय्याने रस्ते लगत खोदकामे केली जात आहेत. ऐवढेच नव्हे तर राष्ट्रीय महामार्गालगत सुध्दा जोरदार खोदकाम सुरू आहे. खोपोली शहरासह तालुक्यातील शहरी, ग्रामीण रस्त्यांसह राज्य व राष्ट्रीय महामार्ग खोदून रस्त्यांची ही दुरावस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. खोदलेल्या ठिकाणी पाईपलाईन टाकल्यानंतर थातूरमातूर पद्धतीने माती टाकून महानगर गॅस कपनीकडून पळवाट काढण्यात येते. परिणामी पाऊस झाल्यावर ज्या ठिकाणी माती टाकण्यात आली आहे, ती माती मोठ्या खड्ड्यांचे स्वरूप धारण करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

त्याचप्रमाणे रस्त्यांलगत टाकण्यात आलेल्या मातीच्या ठिकाणी देखील कोणतीही सुरक्षा नियम व कायदे पाळले जात नसल्याचे दिसून येत आहे. धोकेदायक अवस्थेत असणाऱ्या खड्ड्यांमुळे अनेकदा अपघात ही होत आहेत तर अपघातात अनेक जण जखमी देखील झाले आहेत. मात्र, एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना रस्त्यांची झालेली नादुरुस्ती दिसत नाही का? नागरिकांचे जीव गेल्यावर हे अधिकारी लक्ष देणार का? ते जबाबदार ठेकेदारांवर कारवाई का केली जात नाही? डांबरी, काँक्रीट रस्ते खोदून ते रस्ते पुन्हा जसे तसे का बनविले जात नाही? या खड्ड्यांमधून अपघात होऊन नागरिकांचे बळी पडल्यावर महानगर गॅस कंपनी व एमएसआरडीसीचे अधिकारी प्रशासन गेलेले जीव परत आणून देणार का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून विच–ारला जात आहे.



शहरात घरोघरी स्वयंपाकाचा गॅस पोहचविण्यासाठी महानगर गॅस लिमिटेड (MNGL) कंपनीकडून पाइपलाईन (Pipe Line) टाकण्याचे काम सुरू आहे. परंतु नियमानुसार खोदाईचे कामे होत नसल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. खोदाई झालेल्या भागात अपघातांचे प्रमाण वाढल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित गॅस कंपनीलाच प्रशासनाने नोटीस बजावून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन रायगड जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी केली आहे.